महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ४९-२२ | दिनांक १४/०२/२०२२

**"जबरी चोरी करणा-या आरोपीस अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात वालीव पोलीस ठाणेच्या, गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश."**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी हे दिनांक - १२/१२/२०२१ रोजी रात्री ११:३० वा चे सुमारास नायगाव ते भोयदापाडा जात असताना वाघराळपाडा नाका येथे ४ इसमांनी दोन मोटार सायकल वरुन पाठीमागुन येवुन फिर्यादी यांच्या मोटार सायकल ला ठोकर मारली. फिर्यादी हे खाली पडले असता, चौघांनी मिळुन फिर्यादीस लाथा बुक्यांनी जबर मारहान करुन फिर्यादीची ॲवेंजर मोटार सायकल,मोबाईल व रोख रक्कम जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले होते.सदर बाबत फिर्यादी यांनी वालीव पोलीस ठाणे येथे खबर दिल्याने ०४ अज्ञात इसमां विरुध्द गुन्हा रजि.नं.I१४१२/२०२१ भा.द.वि.स.क-३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर आरोपीत यांचा गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेऊन आरोपीत १) देवाराम राणा रा.संतोषभुवन नालासोपारा पुर्व,ता.वसई, जि.पालघर. याला अटक करुन आरोपीत याच्या कडुन फिर्यादीची चोरी केलेली एक मोटार सायकल व एक मोबाईल असा एकूण ७०,०००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत केला आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुंळीज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक श्री.राहुलकुमार पाटील (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना.सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, भालचंद्र बागुल, पो.अंम.गजानन गरीबे सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ जयवंत खंडवी, यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

------0000------